जा. क्र. /प्रा /प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 10 JUL 1995

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद पुणे-११.

विषय :- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस १०९५/८०९२/प्राशि-३ दिनांक २९.१०.९४ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९४ पासून इयत्ता १ ली ते सन १९९४ -९५ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीत प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्तवावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्जी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानतत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| १) श्री. विठ्ठल विद्या प्रसारक मंडळ, खंडोबानगर, पणदरे ता. बारामती. | खंडोबानगर, पणदरे ता. बारामती जि. पुणे. | इ.१ली ची फक्त एक वर्ग | मराठी. |

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.
२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.
२.३ शाळेत शासनाने वेळो वेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेचा आवश्यक [illegible]

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषर्क सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळो वेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा-व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज ~~समक्ष~~ सक्षम क्षेत्रिय अधिकाऱ्याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहिल अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था , संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [ यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा. ]

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळ प्रतीवर शिक्षण उप-संचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :-

प्रशासन अधिकारी /महानगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ
जिल्हा ________________ यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :-

मा. सचिव,
श्री. विठ्ठल विद्या प्रसारक मंडळ, शिंदेवाडीनगर, पणदरे ता. बारामती
जि. पुणे. ________________ यांना माहितीसाठी अग्रेषित.

शिदे/२६४९५.

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/वर्ग-तु/परवानगी
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक :- ५/८/९६

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [ प्राथमिक ]
जिल्हा परिषद, पुणे विभाग. पुणे

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
----------- -------------

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५.

विषय:-मान्यताप्राप्त ~~अनुदानित~~/विनाअनुदानित/कायम विना ~~अनुदानित~~ खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्याचे नावासमोर दर्शविण्यांत आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/जादा तुकडीस जून १९९६ पासून ~~अनुदान~~/विनाअनुदान/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस.वाढ | शेरा/मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री विठ्ठल प्राथमिक विद्या मंदिर भिकोबानगर ५/७/९६ | मराठी | इ. २ री | १ तुकडी | मंजूर |

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १. करिता

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
श्री विठ्ठल प्राथमिक विद्यामंदिर

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथ]
जा. क्रं. जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/तुकडी-
-मान्यता/७/ ९८३ /९९
पुणे-१ दिनांक :- ३१ .३. १९९९

BOOK-POST

प्रति,

मुख्याध्यापक,
श्री विठ्ठल प्राथ. विद्या मंदीर
भिकोबानगर पाठेपणदरे बारामती.

विषय :- मान्यता प्राप्त विना अनुदानित खाजगी प्राथ. शाळांना नैसर्गिक वाढीच्या वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्रं. प्रा/प्राशि/खाप्राशा-जा. जु. /पी. आर. -३३२० दि. १६. ३. ९९

उपरोक्त विषय व संदर्भानुसार खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नांवासमोर दर्शविणेत आलेल्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास जादा तुकडीस जून १९९८ पासून विना - अनुदान तत्वावर मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्रं. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता : तुकडी / नै. वाढ | मंजूर / नामंजूर |
|---|---|---|---|---|
| | श्री. विठ्ठल प्राथमिक विद्या-मंदीर, भिकोबानगर पाठे-पणदरे, बारामती | मराठी | इ. ३रीची १ली तु. | मंजूर |
| | | | इ. ४थीची १ली तु. | मंजूर |

शिक्षणाधिकारी (प्राथ)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ ५८३ /२०१०
पुणे १. दिनांक :- १०/०८/२०१०

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
**श्री विठ्ठल प्राथमिक विद्या मंदिर, भिकोबानगर, पो.पणदरे,**
**ता.बारामती, जि.पुणे.**

**विषयः- कायम/ विना अनुदान तत्त्वावर शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/ नैसर्गिक वाढीचा/ वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया/ वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.**

**संदर्भः-** १.शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि-३ दि.१४ जानेवारी २००३
२.शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि-३ दि. २३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/**जादा तुकडया**/ वर्ग सन-२००९-१० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/ नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री विठ्ठल प्राथमिक विद्या मंदिर, भिकोबानगर, पो.पणदरे, ता.बारामती, जि.पुणे. | मराठी | १ ली ची २री<br>२ री ची २री<br>३ री ची २री<br>४ थी ची २री | अतिरीक्त तुकडी | कायम विना अनुदान तत्तवार मान्य |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसासायिक अर्हतेचा व्र आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतन श्रेण्या व सेवा शर्ती च्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच् शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चागंली असावयला हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. **सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडी मुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.**
६. **सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या आवश्यक आहे.**
७. **तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यमा रद्द करणात येईल.**
८. **पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे.**

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/जा. तु. /पीआर/3320,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 16 MAR 1999

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय :- मान्यताप्राप्त ~~अनुदानित~~/विनाअनुदानित/~~कायम विनाअनुदानित~~ खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत....

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/~~जादा~~ तुकडीस जून, १९९८ पासून ~~अनुदान~~/विनाअनुदान/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव. | माध्यम. | इयत्ता. | तुकडी/जादा/नै. वाढ. | शेरा/मंजूर/नामंजूर. |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री विठ्ठल प्राथमिक विद्यामंदिर, भिकोबानगर, पाहुणेवाडी(?) पाठपणदरे, बारामती. | मराठी. | इ.३ री व ४ थी ची १ली तु.मान्य. | नैसर्गिक. | मंजूर. |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता.

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. हे.

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
श्री. विठ्ठल प्राथमिक विद्यामंदिर,
भिकोबानगर, पाठपणदरे, बारामती, जि. पुणे.

पुणे जिल्हा परिषद, पुणे,-
"यशवंतराव चव्हाण भवन",
शिक्षण विभाग [ प्राथ ].

जा.क्रं. जिप/शिक्षण/प्राथ/२/४/तुकड्या/९७
पुणे - १ दिनांक:- ११ /४/१९९७.

प्रति,

मुख्याध्यापक,
श्री. विठ्ठल प्राथ. विद्या मंदीर त्रिकोणा नगर
पणदरे ता. बारामती.

विषय:- मान्यताप्राप्त अनुदानित/विना अनुदानित/ अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/ नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्रं.प्रा/प्राशि/खाप्राशा/जा.क्रं.पीडीआर दि. निरंक
२/- —— " —— ३०४५ दि. ५/३/९७

संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या शाळेस सन १९९६-९७ या वर्षासाठी जून-९६ पासून खाली दर्शविलेल्या इयत्तांना नैसर्गिक वाढीने जादा तुकडीस कायम स्वरुपी ~~अनुदान तत्वावर~~/विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | इयत्ता | जादा तुकडी शेरा नैसर्गिक तुकडी |
|---|---|---|---|
| १) | श्री. विठ्ठल प्रा. वि. मं. त्रिकोणानगर पणदरे | इयत्ता २ री ची १ ली तुकडी. | |

शिक्षणाधिकारी (प्राथ)
पुणे जिल्हा परिषद, पुणे